# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७ / चैत्र १०, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**<br>**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**<br>**(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री**<br>**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**<br>**(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मावेजा देण्याबाबत

**(१) * ३०४०३ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दहीकळंबा, दाताळा, आलेगाव व भिमलातांडा (ता.कंधार, जि.नांदेड) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी आलेगाव खांडी ते उमरा खांडी दरम्यान रस्ता तयार करण्यासाठी शासनाकडून सन १९७२-७३ मध्ये जमिनी संपादित केल्या असून त्या शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मावेजा मिळाला नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मावेजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

मौजे दहीकळंबा, दाताळा, आलेगाव व भिमलातांडा ता.कंधार, जि.नांदेड येथील शेतकऱ्यांनी मावेजा मिळाला नसल्याची तक्रार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, नांदेड यांचेकडे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी केलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-०५/२०१०/प्रक्र-१११/अ-२ दिनांक २६/१०/२०१० अन्वये सन १९७१-७२ मध्ये झालेल्या रस्त्यासाठी जमीन मालकांनी नुकसान भरपाईची मागणी केल्यास अशी नुकसान भरपाई संबंधितांना देण्यात येवू नये व अशी प्रकरणे नाकारण्यात यावीत याबाबत सूचना आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील भीमा नदीपात्रातून होणारे अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत

**(२) * २९७४८ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवीकवठा-म्हैसलगी (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) येथील भीमा नदीपात्रातून बेकादेशीररित्या २४ तास वाळू उपसा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन नियमानुसार १० तास वाळू उपसा करण्याचा नियम असूनही २४ तास वाळू उपसा केली जात असल्यामुळे वाळू गाडीभरुन नेत असतांना वाळूचे कण नागरीकांच्या डोळ्यात व अंगावर पडत असल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे देवीकवठा-म्हैसलगी, ता.अक्कलकोट हा वाळूगट सन २०१६-१७ या वर्षात लिलावात गेला असून, संबंधित लिलावधारकाकडून वाळूचे उत्खनन करण्यात येत आहे. सदर वाळूगटाची तहसिलदार अक्कलकोट यांच्या पथकामार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येते. तपासणीमध्ये वाळूचे उत्खनन विहित वेळेत करण्यात येत असल्याचे दिसून आले आहे. वाळू वाहतुकीमुळे सदर भागात नागरिकांच्या डोळ्यात वाळूचे कण जावून नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील महामार्ग चौपदरीकरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(३) * २८०८२ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील महामार्ग चौपदरीकरणासाठी जमिनी संपादित केल्या असून जमीन मालकांना मोबदला देण्यासाठी रूपये २६८ कोटींचा पहिला टप्पा प्रांत कार्यालयात जमा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिपळूण तालुक्यातील १३ गावांसाठी आणखी रूपये ७७ कोटींची आवश्यकता असून त्याबाबतची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महामार्ग चौपदरीकरणासाठी संपादित केलेल्या जमीन मालकांना पहिल्या टप्प्यातील प्राप्त निधीचा मोबदला वितरीत करण्याबाबत तसेच, उर्वरित १३ गावांसाठी रुपये ७७ कोटींचा निधी केंद्र शासनाकडून मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

चिपळूण तालुक्यातील १३ गावाच्या भूसंपादन निवाड्याच्या एकूण रुपये ३४६.२४ कोटी रकमेपैकी केंद्र शासनाने जानेवारी, २०१७ पर्यंत रुपये २६८.२९ कोटी निधी वितरीत केला असून उर्वरीत रुपये ७७.९५ कोटी निधीची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आलेली आहे. सदरील १३ गावांमधील भूसंपादनाच्या मोबदल्याची रक्कम वाटपाची कार्यवाही उपविभागीय अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी (भूसंपादन), चिपळूण यांचेमार्फत निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात आली आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने भाडेपट्टयाने दिलेली जमीन एचओसी कंपनीने परस्पर विक्री केल्याबाबत**

**(४) * २८१८० श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील रसायनी परिसरातील एचओसी कंपनीस सन १९६० मध्ये दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टा कराराने १४ गावातील शेतकऱ्यांनी १६०० एकर जमीन एचओसी कंपनीस दिलेली असून जमिनीच्या विक्री संदर्भात शेतकरी प्रकल्पग्रस्त संघटनेने तीव्र विरोध दर्शवून दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास कंपनीवर मोर्चा काढून आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने शेतकऱ्यांची जमीन परस्पर विक्री करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी दर जमिनी संदर्भात मोर्चा काढून कंपनी व्यवस्थापनाकडे कोणत्या मागण्या केल्या आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) एचओसी कंपनीसाठी सन १९६० मध्ये सदर जमीन दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टा कराराने दिलेली नसून भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या तरतुदीनुसार संपादित करण्यात आली आहे.

तसेच शेतकरी प्रकल्पग्रस्त संघटनेने दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी एचओसी कंपनी परिसरात मोर्चा काढलेला होता.

(२) अद्‌याप एचओसी कंपनीने परस्पर सदरहू जमिनी विक्रीचे व्यवहार केलेले नाहीत.

सदर जमीन एचओसी कंपनीच्या नावाने दाखल आहे. नीती आयोगाच्या शिफारशीनुसार एचओसी कंपनीची खालापूर तालुक्यातील २० एकर जमीन इस्रोसाठी व उर्वरित औद्‌योगिक झोनमधील जमीन बीपीसीएलला विकण्यासंदर्भात प्रस्तावित आहे व त्यातून मिळणाऱ्या रकमेतून कामगारांची सांविधानिक देणी व इतर सांविधानिक देणी देण्याचा प्रस्ताव आहे असे कंपनी व्यवस्थापनाने कळविले आहे.

(३) शेतकऱ्यांच्या मागण्यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयास प्राप्त झालेले नाही. तसेच कंपनी व्यवस्थापनाकडे संबंधित शेतकऱ्यांनी कोणत्या मागण्या केल्या याबाबतची माहिती सदर कार्यालयाकडे उपलब्ध नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर सुधार प्रन्यास हद्दींतर्गत भूखंडाचे फेरफार तात्पुरती मंजुरी दिलेल्या अभिन्यासांच्या नकाशावर करण्यात आल्याबाबत

**(५) * २७२४० श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यासच्या हद्दींतर्गत येणाऱ्या अभिन्यासातील सर्व भूखंडाचे फेरफार हे नागपूर सुधार प्रन्यासने संपूर्णत: मंजूरी दिलेल्या नकाशावरच करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरालगत नागपूर सुधार प्रन्यासच्या हद्दीत असलेल्या मौजा बेसा मधील खसरा नं. ८४/१ वरील अनेक भूखंडाचे तसेच, मौजा बेसा-बेलतरोडी ग्रामपंचायतच्या हद्दींतर्गत येणाऱ्या अभिन्यासांतील भूखंडाचे हस्तलिखित फेरफार हे नागपूर सुधार प्रन्यासने तात्पुरती परवानगी दिलेल्या अभिन्यासांच्या नकाशावर करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार तात्पुरती मंजूरी दिलेल्या अभिन्यासांच्या नकाशावर भूखंडाचे फेरफार करणाऱ्या पटवारी, मंडळ अधिकारी व तहसिलदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजा बेसा प.ह.नं. ३८ अ येथील ख.नं. ८४/१, (क्षेत्र २.२३ हे.आर) ही जमीन निवासी वापराकरिता अकृषिक करण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दि. १९ जानेवारी, २००५ च्या आदेशान्वये काही अटीवर मान्यता दिली आहे. उक्त जमिनीबाबत सहायक संचालक, नगर रचना यांनी 'सीमांकन करण्याकरिता प्रस्तावित' असा शिक्का व सही असलेल्या नकाशाची छायांकित प्रत व दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणीकृत खरेदीखताच्या आधारे फेरफार नोंदी घेतल्याचे आढळून आले आहे.

उक्त जमिनीच्या अभिन्यासाला तात्पुरती किंवा अंतिम मंजूरी नागपूर सुधार प्रन्यासद्वारे देण्यात आलेली नाही. या प्रकरणी चौकशी करुन, योग्य निर्णय घेण्याबाबत, उपविभागीय अधिकारी नागपूर (ग्रा.) यांना जिल्हाधिकारी, नागपूर यांनी कळविले आहे.

-----------------

**बीड जिल्हयातील इनामी व देवस्थान जमिनीवरील अतिक्रमण रोखण्याबाबत**

**(६) * ३०५२७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, धारूर, माजलगाव, वडवणी, परळी, अंबाजोगाई (जि.बीड) या तालुक्यातील तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांच्या संगनमताने इनामी व देवस्थानच्या हजारो एकर जमिनीची खरेदी-विक्री व अतिक्रमण झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बीड जिल्हयातील इनामी व देवस्थानच्या जमिनीची माहिती तालुकानिहाय जाहीर करून जमीन संरक्षणासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही. परंतू बीड तालुक्यातील मौजे आहेर चिंचोली येथील गट नं. १६ श्रीराम मंदीर बीड च्या इनामी जमिनीवर बेकायदेशीर वहितीची तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीची चौकशी तहसिलदार, बीड यांचेस्तरावर सुरु आहे.

-----------------

## सुकळी (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील शहानूर नदीपात्राला संरक्षण भिंत उभारण्याबाबत

**(७) * २६७३१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकळी (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथे गत ८ ते १० वर्षापासून गावालगत गेलेल्या शहानूर नदीमुळे सुकळी गावाला पुराचा धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नदीचे पात्र खोल करून संरक्षण भिंत उभारण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा नागरीकांनी शासनास दिला आहे तसेच यासंदर्भात मागणीचे एक निवेदन उपविभागीय अधिकारी, अमरावती यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संरक्षण भिंत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर ठिकाणी भूगर्भाच्या रचनेमुळे संरक्षक भिंत/नदीतीराचे बळकटीकरण या योजना निष्फळ होणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माथेरान (जि.रायगड) पर्यटन स्थळी ई-रिक्षा सुरु करण्याबाबत

**(८) * २९४९६ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक १८०९५ ला दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) येथील स्थानिक वृध्द व विद्यार्थ्यांची तसेच अपघातग्रस्त रुग्णांची गैरसोय होणार असल्याने ई-रिक्षा सुरु करावी अशी मागणी श्रमिक रिक्षा चालक मालक सेवा संस्था माथेरान यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाबाबतची नस्ती गेल्या २-३ महिन्यांपासून शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार ई-रिक्षा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अशा स्वरुपाची मागणी श्रमिक रिक्षा चालक मालक सेवा संस्था माथेरान यांनी केली आहे.
(२), (३) व (४) महसूल विभागाच्या सन १९५९ च्या शासन निर्णयान्वये माथेरान या पर्यटन स्थळासाठी विहित नियमावली नुसार माथेरान येथे मोटारगाडी, सायकल, तीनचाकी गाडी इत्यादी कोणत्याही प्रकारची वाहने वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. तद्नंतर केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक ४/२/२००३ च्या अधिसूचनेन्वये माथेरानचा पर्यावरणीयदृष्टया संवेदनशील क्षेत्रामध्ये समावेश करण्यात आला असून रुग्णवाहिका तसेच अग्निशमनदलाच्या वाहन तसेच घनकचरा वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनास माथेरान नगरपरिषदेच्या हद्दीत मज्जाव करण्यात आला आहे.

माथेरान येथे ई-रिक्षा/सीएनजी रिक्षा किंवा बॅटरीवर चालणारी रिक्षा याने वाहतूक करण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण यांचेमार्फत शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, सदर प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाच्या दिनांक ४/२/२००३ च्या अधिसूचनेन्वये गठीत संनियंत्रण समितीच्या अभिप्रायसह शासनास फेरसादर करण्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांना सूचित करण्यात आले आहे.

-----------------

**नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग मेगासिटी शेजारील जमीन खरेदी प्रकरणाबाबत**

**(९) * ३०३४७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गावरील रस्ते व मेगासिटी शेजारी राज्यातील बड्या आजी माजी सनदी अधिकाऱ्यांनी शेकडो हेक्टर जमिनी खरेदी केल्या असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जमीन प्रकरणातील आर्थिक स्त्रोतांची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) याबाबत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये काही वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द झालेल्या होत्या. तसेच सन २०१६ च्या हिवाळी अधिवेशनात दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी विधानसभेत सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम ९७ अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना मांडली होती. सदर स्थगन प्रस्तावाच्या सूचनेत सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्याच्या अनुषंगाने चौकशी केली जाईल असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहास दिले आहे. सदर आश्वासनाच्या अनुषंगाने, तसेच माहे डिसेंबर, २०१६ मध्ये या संदर्भात विविध वर्तमानपत्रातील बातम्यात उपस्थित केलेल्या बाबींची शहानिशा करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्यास सर्व संबंधित विभागीय आयुक्तांना शासनाने कळविले असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## जळगांव जिल्हयातील शेतकऱ्यांना केळी खोडापासून मुल्यवर्धित उत्पादन तयार करुन उत्पन्न मिळवून देण्याबाबत

**(१०) * २९५७७ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील केळयांपासून तयार केलेली ड्राय केळी विद्यार्थ्यांना देण्याबाबत व केळीच्या खोडा पासून धागा तयार करून त्यातील पाणी हे फवारणी व सेंद्रीय शेतीसाठी उत्कृष्ट असल्याबाबत कृषी विभागाकडून काही संशोधन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव जिल्हयातील केळीच्या टाकवू खोडापासून टिकावू वस्तू कशी बनेल व शेतकऱ्यांना उत्पादनांवर आधारित भाव मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

मे.तापी व्हॅली बनाना प्रोसेसिंग अँड प्रोडोक्टस को-ऑपरेटीव्ह सोसायटी लिमिटेड फैजपूर, तालुका-यावल, जिल्हा-जळगाव व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत केळी संशोधन केंद्र, जळगाव यांनी संयुक्तपणे सादर केलेल्या पथदर्शी प्रकल्पांतर्गत केळीच्या खोडावर प्रक्रिया करुन मुल्यवर्धीत उप-उत्पादने तयार करुन शेतक-यांना अतिरिक्त उत्पन्न मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेतर्गत पथदर्शी तत्वावर प्रकल्प मंजूर करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प सद्यस्थितीत प्रगती पथावर असून त्याचे अंतिम निष्कर्ष प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्राप्त होतील.

(२) व (३) उपरोक्त प्रमाणे पथदर्शी प्रकल्पाचे निष्कर्ष प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**वाघोली (ता.चाकूर, जि.लातूर) येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(११) * ३०४३० श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (ता.चाकूर, जि.लातूर) येथे नापिक जमीन व कर्जबाजारीपणा यामुळे शेतकऱ्यानी आत्महत्या केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी शासन निर्णयान्वये आर्थिक मदत मंजूर करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर (ग्रामीण), गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) * २९५२१ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (ग्रामीण), गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत (आरटीओ) या पाच आरटीओ कार्यालयात रोज सुमारे ३०० नवीन वाहनांची नोंद होत असून सदर कार्यालयात अधिकारी व कर्मचारी यांची २६८ मंजूर पदे असताना १०४ पदे रिक्त असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असल्याचे दिनांक ५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे असल्यामुळे नागरीकांची कामे वेळेत पूर्ण होत नसून नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) प्रादेशिक परिवहन विभाग, नागपूर (ग्रामीण) अंतर्गत कार्यरत प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामीण), उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा या ५ कार्यालयांमध्ये मागील १० महिन्यामध्ये प्रती दिन सरासरी ३६८ वाहनांची नोंदणी झालेली असून, सदर कार्यालयांसाठी शासनाने एकूण २३३ अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे मंजूर केलेले असून त्यापैकी ७१ पदे रिक्त आहेत.

(२) नागरिकांना त्रास न होता त्यांची कामे वेळेत पूर्ण व्हावी यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

(३) राज्य स्तरावर रिक्त असलेल्या पदांपैकी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक पदाच्या १८८ तर सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी पदांच्या ३ जागांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मुंबईबाहेरील लिपीक टंकलेखक/सहाय्यक रोखपाल/कर अन्वेषक या पदांसाठीची भरती प्रक्रिया परिवहन आयुक्त कार्यालय स्तरावर सुरू आहे.

याशिवाय शासनाने लिपीक-टंकलेखक संवर्गातील ८८ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यास परवानगी दिलेली असून, त्यापैकी १२ उमेदवारांना नागपूर ग्रामीण विभागात नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे गट-क व ड मधील पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही वेळोवेळी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोटी, माळवाडी व आंबीदुमाला (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) परिसरात भूकंप सदृश्य धक्के सुरू असल्याबाबत**

**(१३) * २९६५०  श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोटी, माळवाडी व आंबीदुमाला (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) परिसरात माहे जानेवारी, २०१७ पासून भूकंप सदृश्य धक्क्याचे सत्र सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नागरीकांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीकडे उक्त बाब निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी तसेच राज्याच्या तांत्रिक यंत्रणेमार्फत संबंधित गावांना भेट देऊन सर्वेक्षण करण्यात आले असून नागरीकांना भूकंपाची आपत्ती उद्‌भवल्यास करावयाच्या उपाययोजना, बचावासंदर्भात प्रशिक्षण देऊन जनजागृती कार्यक्रम व कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे खंडाळा (बूज), (ता.नरखेड, जि.नागपूर) येथील खाणपट्टाधारकांनी मंजूर क्षेत्रापेक्षा जादाचे उत्खनन केल्याबाबत

**(१४) * ३०६८४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खंडाळा (बूज), (ता.नरखेड, जि.नागपूर) येथील सर्वे नं. ५५/१ व १३० मधील खाणपट्टाधारकाने मंजूर क्षेत्राबाहेर व जास्त उत्खनन केल्या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, काटोल यांनी दिनांक ७ जानेवारी, २०१५ च्या आदेशान्वये रुपये ७,६४,६६,७४६/- एवढा रकमेच्या दंडाच्या आदेशाचे पुनर्रीक्षण करण्याची अर्धन्यायिक कार्यवाही जिल्हाधिकारी, नागपूर यांनी केली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दंडात्मक रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे खंडाळा (बुज), (ता.नरखेड, जि.नागपूर) येथील सर्वे नं. ५५/१ व १३० मधील उत्खननाचे मोजमाप केले असता, संबंधित परवाना धारकाने शासन जमा केलेल्या स्वामित्वधनाच्या रकमेपेक्षा जास्त गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यावरून तहसिलदार नरखेड यांनी दिनांक ७/०१/२०१५ रोजी रूपये ७,६४,६६,७४६/- एवढ्या रकमेचे दंडाचे आदेश पारित केले होते.

सदर आदेशाविरूध्द उपविभागीय अधिकारी काटोल यांच्यासमोर दाखल अपिल अर्जामध्ये, त्यांनी दिनांक २७/०२/२०१५ रोजी आदेश पारित करून, संबंधितांनी मध्य रेल्वेकडे जमा केलेल्या स्वामित्वधनाची रक्कम मध्य रेल्वेने दिनांक २५/०२/२०१५ रोजी शासनाकडे जमा केली असल्याने तहसिलदार नरखेड यांचे आदेश रद्द केले.

जिल्हाधिकारी, नागपूर यांनी उपविभागीय अधिकारी, काटोल यांच्या दिनांक २७/०२/२०१५ रोजीच्या आदेशाचे पुनर्रिक्षण केले असून त्यामध्ये संबंधितांनी सन २००७ ते २०१४ या कालावधीत ११,८०० ब्रास गौण खनिजापोटी रूपये १९,९१,१०७/- एवढी स्वामित्वधनाची रक्कम वेळोवेळी शासन जमा केल्याचे, तसेच ७९,२३८ ब्रास गौण खनिजापोटी रूपये १,०५,२०,३४१/- एवढी

स्वामित्वधनाची रक्कम मध्य रेल्वेने त्यांच्या देयकातून वेळोवेळी कपात करून एकत्रितपणे शासनजमा केल्याचे आढळून आले. त्यानुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक ०४/०२/२०१७ च्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी काटोल यांचा दिनांक २७/०२/२०१५ रोजीचा आदेश कायम केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी येथील वळण रस्त्याची जमीन मोजणी व भूसंपादनाच्या कामांबाबत**

**(१५) * २७६३२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील वळण रस्त्याची जमीन मोजणी व भूसंपादनाचे काम माहे मार्च अखेर तर रस्त्याचे पुर्ण काम जुलै अखेर पुर्ण करण्यात येईल अशी माहिती जिल्हाधिकारी, परभणी यांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पत्रकाराच्या शिष्टमंडळास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार राष्ट्रीय महामार्ग वळण रस्त्याच्या मोजणी कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधित उपअभियंत्यांवर कारवाई करून सदर कामे मुदतीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) परभणी वळण रस्त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ नुसार विहीत मुदतीत भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्याने भूसंपादनाची प्रक्रिया नव्याने सुरु करणे क्रमप्राप्त झाले.

जिल्हाधिकारी, परभणी यांनी मोजणीच्या कामात दिरंगाई झाल्याबाबत अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, औरंगाबाद यांचेकडून अहवाल मागविला असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सद्य:स्थितीत संयुक्त मोजणीच्या कार्यवाहीनुसार अधिसूचना ३ (A) चे सुधारीत प्रारुप रस्ते वाहतूक मंत्रालयाला प्रसिध्दीसाठी सादर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विमा देण्याबाबत**

**(१६) * २७६२० श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील शेतकऱ्यांनी सन २०१४-१५ मधील खरीप हंगामाचा पीक विमा महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा, राजूर येथे भरल्यानंतरही त्यांना पीक विम्याची रक्कम मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँक अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे २८० हून अधिक शेतकऱ्यांना पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहावे लागले असून शेतकऱ्यांनी मागणी करूनही त्यांना पीक विमा मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना पीक विमा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१), (२) व (३) महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा राजूर (ता.भोकरदन, जि.जालना) यांनी राष्ट्रीय कृषी विमा योजना खरीप २०१४ अंतर्गत विमा संरक्षण घेणाऱ्या १०५५ शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव भारतीय कृषी विमा कंपनीस विहित कालावधी नंतर सादर केल्याने भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत सदर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही. योजनेच्या तरतुदीनुसार उशिराने प्राप्त प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्ताव केंद्र शासनाला सादर झाला. केंद्र शासनस्तरावर झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार बँकेने शेतकऱ्यांचे प्रस्ताव विहित मुदतीनंतर पाठविल्यामुळे सदर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित बँकेची आहे असे कळविण्यात आले. त्यानुसार भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत, तसेच, कृषी आयुक्तालयामार्फत सर्व संबंधित बँकांना पात्र शेतकऱ्यांची नुकसान भरपाई बँकामार्फत अदा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोईसर (जि.पालघर) परिसरातील एसटीच्या प्रवासी निवाऱ्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१७) * २८९२६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) परिसरातील एसटीच्या प्रवासी निवाऱ्यांमध्ये गर्दुल्यांचे व गुरांचे वास्तव्य असून याभागातील असंख्य एसटीचे प्रवासी निवारे दुरवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून एसटीच्या प्रवासी निवाऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) बोईसर (ता.जि.पालघर) या ग्रामीण भागातील चिंचणी येथील मार्ग निवारा वगळता अन्य मार्ग निवारे सुस्थितीत आहेत. नादुरुस्त असलेल्या प्रवासी निवाऱ्यांची पुनर्बांधणी राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

राज्य परिवहन महामंडळातर्फे बांधण्यात आलेल्या प्रवासी मार्ग निवाऱ्यांची स्वच्छता ही स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गावरील धोकादायक पुलांची दुरूस्ती करण्याबाबत

**(१८) * २७५०७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २३५३३ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील अवजड वाहनासहित हलक्या वाहनांची वाढलेल्या वाहतुकीमुळे अनेक पुल धोकादायक अवस्थेत झाल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या पुलांची तज्ञांच्यामार्फत पहाणी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्रिय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिनस्त असलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील सर्व पूल सन २०१६-१७ च्या पावसाळ्यानंतरच्या निरीक्षणाअंती वाहतुकीसाठी सुरक्षित असल्याचे आढळून आले.

सदर पूलांबाबतची निरीक्षण व सर्व माहिती IBMS (Indian Bridge Management System) ह्या ऑनलाईन प्रणालीवर संकलित करण्यासाठी मे.ध्रुव कन्सल्टन्सी सर्व्हिस प्रा.लि. मुंबई यांना नियुक्त करण्यात आले असून त्यांचेमार्फत सविस्तर सर्वेक्षणाचे काम प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या बांधकामांबाबत**

**(१९) * २६७४५ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय वाहतूक मंत्रालयाने मराठवाड्यासाठी रूपये १८ हजार कोटींचा रस्ते विकास प्लॅन घोषित केलेला असून दिनांक २५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यादरम्यान मा.केंद्रीय वाहतूक मंत्री यांच्या उपस्थितीत रूपये १८ हजार कोटींच्या गोल्डन टॅंगल कामांचे भूमिपूजन झालेले असतानाही या कामांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मा.केंद्रीय मंत्री रस्ते वाहतूक व महामार्ग यांच्या उपस्थितीत दिनांक २५ डिसेंबर, २०१५ रोजी औरंगाबाद येथे रु. १७,७०६ कोटी अंदाजित किंमतीच्या १५२८.६० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे बांधकामाचे प्रतिकात्मक भूमिपूजन करण्यात आले, हे खरे आहे.

त्यापैकी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत रु.६७७८ कोटी अंदाजित किंमतीच्या ४०२ कि.मी. लांबीच्या राष्ट्रीय महामार्गांच्या पेव्हर शोल्डरसह दुपदरीकरण/चौपदरीकरणाच्या विविध प्रकल्पांची बांधकामे प्रगतीत आहे.

तसेच मराठवाड्यातील १०८९ कि.मी. रस्ते तत्वत: राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आलेले असून त्यापैकी औरंगाबाद ते जळगांव ह्या १५० कि.मी. महामार्गाच्या रुंदीकरणासाठी रुपये १००० कोटी अंदाजित किंमतीचे प्रकल्प निविदा स्तरावर असून उर्वरीत रस्त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे व कल्याण शहरातील शासनाच्या अखत्यारीत असलेले मोकळे भुखंड आणि मैदानांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) * २७२०८ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व कल्याण शहरातील खेळांसाठी मोकळे असलेले भुखंड आणि मैदाने जत्रोत्सव, मेळावे, लावणी महोत्सव व इतर कार्यक्रमांसाठी देण्यात येत असून सदर शासनाच्या अखत्यारीत असलेल्या मोकळे भुखंड आणि मैदानाची दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर भुखंडाची देखभाल, दुरूस्ती व निगराणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) ठाणे व कल्याण शहरातील मोकळे व खेळाच्या मैदानासाठी आरक्षित शासकीय भूखंड हे संबंधित महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आलेले आहेत.

महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.जमीन-१०९४/प्र.क्र.५८/ज-१, दिनांक ०३/०३/२००७ नुसार शासकीय मोकळ्या जागा/मैदाने तसेच शासकीय/निमशासकीय संस्था/महामंडळे व खाजगी संस्थांना देण्यात आलेल्या शासकीय जमिनीतील मोकळ्या जागा विविध तात्पुरत्या प्रयोजनाकरीता भाड्याने देण्याबाबत धोरण असून त्यानुसार क्षत्रिय स्तरावर कार्यवाही करण्यात येते.

-----------------

**नंदुरबार जिल्ह्यातील तापी नदीवरील हातोडा पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२१) * २८९९५ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील तापी नदीवरील हातोडा पुलाचे काम माहे मार्च, २०१६ अखेरही प्रलंबित असल्यामुळे जिल्हा मुख्यालयाला येणाऱ्या आदिवासी भागातील नागरीकांना जादाचा ३० ते ४० कि.मी. अंतर कापावे लागत असल्याने आर्थिक भुर्दड आदिवासी जनतेला सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तापी नदीवरील हातोडा पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

साधारणत: २५ किमी जास्त अंतराचा फेरा पडतो.

(२) व (३) प्रश्नाधीन पुलाचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करुन पूल वाहतुकीस खुला करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## द्राक्ष बागांचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक आच्छादन या घटकाचा समावेश एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत करण्याबाबत

**(२२) * २७८४७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४३३१ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक आपत्तीमुळे द्राक्ष बागांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक आच्छादन या घटकाचा समावेश एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभागास सादर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रस्तावास केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त झाली आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाकडून केंद्र शासनस्तरावर कोणता पाठपुरावा करण्यात आला आहे, तसेच द्राक्ष उत्पादकांच्या आर्थिक हिताचेदृष्टीने प्रस्तुत घटकाचा समावेश एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) याबाबत शासन तसेच महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांच्या स्तरावरुन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**नेवासा (जि.अहमदनगर) येथील कृषी कार्यालयात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२३) * २९८०८ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३७६९ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) येथील कृषी कार्यालयात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी अधिकाऱ्यांकडून अहवाल प्राप्त झाला आहे काय, सदर अहवालानुसार किती रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) नाही. तथापि, सप्टेंबर, २०१६ मध्ये तक्रार निवेदन प्राप्त आहे. या प्रकरणी तालुका कृषी अधिकारी, शेवगांव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने त्यांचा चौकशी अहवाल सादर केला असून सदर प्रकरणी कुठलाही गैरव्यवहार झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) या प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याची तक्रारदारांनी विनंती केली असून त्यानुषंगाने, उपविभागीय कृषी अधिकारी, राजगुरुनगर यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय चौकशी समिती गठीत केली असून, सदर समितीचा चौकशी अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मांडवी (ता.किनवट, जि.नांदेड) येथे अवैधरित्या गौण खनिजांचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(२४) * ३०४०७ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवी (ता.किनवट, जि.नांदेड) येथे स्थानिक अधिकारी व खनिज माफिया यांच्या संगनमताने अवैधरित्या गौण खनिजांचे उत्खनन होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून अवैध उत्खनन रोखण्याबाबत व सर्व संबंधितांची चौकशी करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) किनवट तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी पथक गठीत करण्यात आले आहे. सदर पथकाने दिनांक ३/०२/२०१७ रोजी केलेल्या तपासणीत किनवट तालुक्यातील मौजे मांडवी, सिंगोडातांडा व लिंगी येथे गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीची ४ वाहने पकडण्यात आली असून, संबंधितांकडून एकूण रुपये १,०४,०००/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. मौजे मांडवी, ता.किनवट येथे स्थानिक अधिकारी यांच्या संगनमताने गौण खनिजाचे अवैध उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातील तालुका पशुवैद्यकीय लघु सर्व चिकित्सालयाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२५) * २८०१५ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातील तालुका पशुवैद्यकीय लघु सर्व चिकित्सालयाची दुरवस्था झाल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी कर्तव्यदक्ष नसल्यामुळे उपचार करण्याकरिता आलेल्या पशुपालकांना ताटकळत बसावे लागते तसेच, जनावरांकरीता तपासणी करण्याकरीता उभारण्यात आलेल्या (ख्वाडा) स्टँडमध्ये जनावरांचे शेण, रक्त, औषधांच्या रिकाम्या बाटल्या, कचरा यामुळे दुर्गंधी वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कर्तव्यदक्ष नसलेल्या पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच, रूग्णालय परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

पंढरपूर (जि.सोलापूर) शहरात तालुका पशुवैद्यकीय लघु सर्व चिकित्सालयाची इमारत सन २०१४ मध्ये बांधण्यात आलेली आहे. सदर केंद्राची इमारत सुस्थितीत आहे.

(२) व (३) सदर ठिकाणी शासकीय दवाखान्याच्या वेळा कटाक्षाने पाळल्या जात असून, कोणत्याही पशुपालकास उपचारासाठी ताटकळत बसावे लागत नाही. शासकीय वेळेनंतर आलेल्या पशुरुग्णास सुध्दा उपलब्धतेनुसार व आजाराचे गांभीर्य पाहून पशुवैद्यकिय सेवा गरजेनुसार तात्काळ उपलब्ध करुन दिल्या जातात.

सदर दवाखान्यात उपचारासाठी पंढरपूर, सांगोला, मंगळवेडा, माळशिरस व परिसरातील दररोज सुमारे ५० ते ६० पशुरुग्ण येतात. सन २०१६-१७ या वर्षात माहे जानेवारी, २०१७ अखेर झालेले तांत्रिक कार्य पुढील प्रमाणे आहे :-

कृत्रिम रेतन-९८६, औषधोपचार-१२५७६, लसीकरण-२१४५०, खच्चीकरण-१५४२, शस्त्रक्रिया-१४९८, गर्भधारणा तपासणी-१४४३, वंध्यत्व तपासणी-१०५५

सदर दवाखान्यात रिकाम्या झालेल्या बाटल्या ठेवण्यासाठी कचराकुंड्या ठेवण्यात आल्या असून, त्याची योग्य रितीने विल्हेवाट लावली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर या दोन जिल्हयांना जोडणाऱ्या शिवडाव-सोनवडे-घोटगे या घाट मार्गाच्या कामाबाबत**

**(२६) * २८१३० श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर या दोन जिल्हयांना जोडणाऱ्या शिवडाव-सोनवडे-घोटगे या घाट मार्गाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या मार्गासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या घेऊन या मार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय

(२) व (३) केंद्र शासन पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालय, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचे कार्यालयाकडून प्रस्तूत प्रकरणी वनेत्तर काम करण्यासाठी सशर्त तत्वत: मान्यता प्राप्त झाली असून वनविभागाकडून stage II approval मिळणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात रेल्वे लाईनसाठी**
**शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्याबाबत**

**(२७) * २८१८१ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात मध्य रेल्वेच्या तिसऱ्या रेल्वे लाईनसाठी येथील शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने जमिनी संपादित करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेल्वे लगतच्या २३ गावातील जमिनी यापूर्वी संपादित केलेल्या असतांना पुन्हा काही हेक्टर जमिनी संपादन करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यासंदर्भात प्रांत अधिकारी यांनी आयोजित केलेल्या बैठकीत कोणताच निर्णय होवू शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

संबंधित खाजगी जमिनी शासन निर्णय दिनांक १२/५/२०१५ व दिनांक ३०/९/२०१५ च्या अन्वये थेट खरेदीने घेण्याबाबतचा प्रस्ताव रेल्वे विभागाकडून दिनांक २१/१/२०१७ रोजी प्राप्त झाला आहे.

(२) शहापूर तहसिल मधील एकूण २४ गावांची सुमारे ४९-६४-२ हे. आर. खाजगी जमीन कल्याण-कसारा ३ ऱ्या रेल्वे (मध्य रेल्वे) मार्गासाठी भूमि संपादन, पुनवर्सन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये संपादित करुन मिळावी म्हणून मध्य रेल्वे, मुंबई यांचे दिनांक ०५/०२/२०१६, दिनांक २१/०१/२०१६, दिनांक १८/०२/२०१६ व दिनांक २९/०१/२०१६ च्या पत्रान्वये प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्राप्त

झाले होते. सदर प्रस्ताव दिनांक २०/०५/२०१६ अन्वये पुढील कार्यवाही करणेकामी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचेकडे पाठविण्यात आले होते.

दरम्यानच्या कालावधीत, रेल्वे विभागाने शासनाकडे रेल्वे प्रकल्पांसाठी शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ च्या तरतुदींप्रमाणे खाजगी जमीन थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुषंगाने शासन पत्र दिनांक ६/१२/२०१६ अन्वये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार शहापूर तहसिल मधील एकूण २४ गावांची जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यासंबंधी नव्याने प्रस्ताव मध्य रेल्वे, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक १२/१२/२०१६ व दिनांक ०२/०१/२०१७ अन्वये उपविभागीय अधिकारी भिवंडी यांचे कार्यालयाकडे दिनांक २१/०१/२०१७ रोजी पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सद्य:स्थितीत, मध्य रेल्वे कडील दिनांक २८/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये २४ पैकी २३ गावांची संयुक्त मोजणीचे काम पुर्ण झाले आहे.

(३) शहापूर तहसिल मधील एकूण २४ गावांपैकी वेहळोली, आसनगांव, खातीवली व कळमगांव येथील शेतकऱ्यांनी मोजणीस हरकत घेतल्याने त्यांचे समवेत शंका निरसनाबाबत उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी दिनांक २३/०१/२०१७ रोजी तहसिल कार्यालय, शहापूर येथे बैठक घेऊन शेतकऱ्यांबरोबर चर्चा करणेत येऊन शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील वाहतुकधारकांकडून आकारण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम कमी करण्याबाबत

**(२८) * २८८०१ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामध्ये हेल्मेट न घालणाऱ्या दुचाकी वाहनधारकांवर आणि तीन चाकी वाहन वहन क्षमतेपेक्षा जास्त तसेच सीटबेल्ट न घालता वाहन चालविणाऱ्या चारचाकी वाहनधारकांवर वाहतूक पोलीसांद्वारे मोबाईल वरून फोटो काढून घरपोच दंडाची नोटीस बजावून दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाठविण्यात आलेल्या दंडाची रक्कम ही रुपये ५००/- वा त्यापेक्षा जास्तच आकारण्यात येत असून अनेक व्यक्तींना न केलेल्या गुन्ह्याकरीता सुध्दा दंड भरावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरातील अशा किती वाहनधारकांवर कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहतुकधारकांकडून आकारण्यात येणाऱ्या जादाच्या दंडाची रक्कम कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरण, २०११ अंतर्गत (कॅशलेस धोरण) संगणकीकृत ई-चलान कारवाई प्रायोगिक तत्वावर नागपूर शहरात दिनांक ०६/१०/२०१६ पासून सुरु करण्यात आलेली आहे. याद्वारे वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांना देण्यात येणारे ई-चलान संबंधित वाहनचालकाच्या पत्त्यावर पोस्ट ऑफिसमार्फत स्पिड पोस्टद्वारे पाठविण्यात येते

(२) नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांकडून भरणा करण्यात येत असलेली दंड स्वरुपातील तडजोड रक्कम पोस्ट ऑफिस (एकूण ६६) व सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकेच्या कोणत्याही शाखेत (एकूण ३१) भरण्याची सोय आहे. वाहतूक पोलीसांनी काढलेले चलान पोस्टाद्वारे संबंधितांकडे पाठविण्यात येत असल्याने पोस्ट ऑफिसकडून प्रति चलान रु.५/- इतके सेवाशुल्क वाहनचालकांकडून घेण्यात येते. सेंट्रल बँक ऑफ इंडिया कडून कोणतेही सेवाशुल्क आकारण्यात येत नसून वाहनचालकास उपरोक्त दोन पैकी कोणत्याही ठिकाणी तडजोड शुल्क भरण्याची मुभा आहे.

अनेक व्यक्तींना न केलेल्या गुन्ह्याकरीता दंड भरावा लागत आहे ही बाब खरी नसून फक्त वाहतुक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनधारकांवरच मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येते.

(३) योजना सुरु झाल्यापासून म्हणजेच दिनांक ०६/१०/२०१६ ते दिनांक २०/०३/२०१७ या कालावधीत एकूण १,२३,८७३ दुचाकी वाहनांवर ई-चलानद्वारे कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांकडून आकारण्यात येणारी दंडाची रक्कम नियमानुसारच आकारण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भडगांव रोड (जि.जळगांव) भागातील शासकीय विश्रामगृहाच्या प्रांगणात प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे शिबीर घेण्याबाबत**

**(२९) * २९५९३ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगांव रोड (जि.जळगांव) भागातील शासकीय विश्रामगृहाच्या प्रांगणात प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे (आरटीओ) शिबीर घेण्यास बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता यांनी विरोध केल्यामुळे गेल्या दोन महिन्यापासून सदरचे शिबीर झाले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याठिकाणी शिबीर घेण्यास विरोध करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरचा शिबीर इतर ठिकाणी घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) जानेवारी, २०१७ मध्ये भडगांव रोडवरील पाचोरा येथील शासकीय विश्रामगृहात शिबीर कार्यालय आयोजित करण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने परवानगी दिली नाही. फेब्रुवारी, २०१७ महिन्यातील शिबीर कार्यालयाचे काम स्थानिक निवडणूकीमुळे झाले नाही. दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी पाचोरा शासकीय विश्रामगृहात शिबीर कार्यालय कामकाज करण्यात आले.
(२) मोठया प्रमाणावर वाहनांची संख्या असल्याने विश्रामगृहात व शासकीय कार्यालयात येण्यासाठी अडचणीचे होते व जनतेचा गोंधळ होत असल्याने शासकीय कामकाजावर त्याचा त्रास होतो, असे उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी कळवून शिबीर कार्यालय आयोजनास जानेवारी, २०१७ मध्ये प्रतिबंध केला होता.
(३) सद्दय:स्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाने आक्षेप न घेतल्याने त्याच ठिकाणी शिबीर कार्यालयाचे कामकाज करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## मौजे रायते (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील महार वतनी जमिनी मुळ वारसदारांच्या नावे करण्याबाबत

**(३०) * २९५२२ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २२७८५ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महार वतनी जमिनी बेकायदेशीर हस्तांतरण होत असून मौजे रायते (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील गाव नमुना ७/१२ सर्व्हे नंबर ४७/७, ५७/६, ८१/३, ९०/२ व ९०/१० या मिळकतींबाबतचा फेरफार क्र.१८२, दि.१५/१२/१९४० हा वारस नोंदी संदर्भातील असून फेरफार क्र.१८२ वर देवकी चिंध्या महार यांचे वारसनातू (मुलीचा मुलगा) जानू मुकूंद महार चे नाव वारसदार म्हणून नोंद केलेली असतांना सदर फेरफार क्र.१८२ वर मूळ दप्तरीत शाई व अक्षरात फरक दिसून येत असून जानू मुकूंद महार यांचे नाव खाडाखोड करून तालुका हुकूम नंबर आरटीएस एम ३७९ नुसार भाऊबंद असे दाखवून भिका शिवा महार यांचे नाव संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने मिळकतीस लागल्याचे दिसून येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने फेरफार क्रमांक १८२ च्या मूळ दप्तरीची तपासणी करून चुकीच्या पध्दतीने जमिनीच्या मिळकतीस लागलेले वारसांच्या नावांची नोंदणी रद्द करून उपरोक्त जमिनी मूळ वारसदारांच्या नावे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मौजे रायते, ता.कल्याण येथील स.नं. ४७/७, ५७/६, ८१/३, ९०/२ व ९०/१० या जमीन मिळकती महार वतनाची असल्याबाबत कोणतेही फेरफार अभिलेखात दिसुन येत नसुन याबाबत इनाम रजिस्टरला देखील नोंद दिसुन येत नाही.

मौजे रायते, ता.कल्याण येथील स.नं. ४७/७, ५७/६, ८१/३, ९०/२ व ९०/१० या मिळकतीबाबत फेरफार क्र. १८२ दिनांक १५/१२/१९४० अन्वये सामाईक खातेदार देवकी चिंध्या महार मयत झाल्याने मुलीचा मुलगा म्हणुन जानू मुकुंद महार यांचे नांव वारस रजिस्टर प्रमाणे दाखल केले व तालुका हुकूमाने भिका

शिवा महार चे नांव दाखल असल्याचे फेरफार क्र. १८२ दिनांक १५/१२/१९४० च्या प्रमाणित प्रती वरुन दिसुन येते. त्याच फेरफारामध्ये जानू मुकुंद महार यांचे नावावर रेषा मारल्याचे दिसून येते. परंतू सदर बाब अधिकारी, कर्मचारी यांचे संगनमताने झाली असल्याचे ठोस पुराव्यांअभावी म्हणता येत नाही.

(२) फेरफार क्र. १८२ विषयी वरील वस्तुस्थिती असुन जानू मुकुंद महार यांचे नावाची नोंद त्यानंतर वर नमुद मिळकतीस दाखल झालेली नाही, तसेच सदर जमिनीपैकी स.नं. ५७/६ बाबत फेरफार क्र. १८६९ दिनांक ०५/११/२०१४ पाहता जानु मुकुंद जाधव हे मयत झालेने वारसाने श्रीम. भागाबाई जानू जाधव (पत्नी), कांताबाई रामचंद्र (मुलगी), यशवंत जानू जाधव (मुलगा), मुकुंद जानु जाधव (मुलगा) याप्रमाणे वारस नोंद झालेली आहे.

सबब फेरफार क्र. १८२ मधील स.नं. ४७/७, ५७/६, ८१/३, ९०/२ व ९०/१० पैकी स.नं. ५७/६ करीता जानू मुकुंद जाधव (महार) यांच्या वारसाची नोंद फेरफार क्र. १८६९ दिनांक ०५/११/२०१४ नुसार झालेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**परभणी शहरातील शासकीय जमिनी बेकायदेशीर हस्तांतरीत झाल्याबाबत**

**(३१) * २७९०६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील मध्यवस्तीत असणाऱ्या सर्व्हे नं. ३१५ ते ३३० मधील जवळपास ७५ एकर शासकीय जमिनी बेकायदेशीररित्या हस्तांतरीत झाल्याबाबतचा अहवाल उपजिल्हाधिकारी, परभणी यांनी दिल्यावरून जिल्हाधिकारी, परभणी यांनी सन २०१६-२०१७ मध्ये वा त्यादरम्यान आदेश काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्याबाबत पुनर्चौकशी करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी, परभणी यांना आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी पुनर्चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्या अहवालानुसार परभणी शहरातील स.नं. ३१५ ते ३१७ आणि ३२५ ते ३२७ मधील जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ मधील भोगवटादार सदरी 'महाराष्ट्र शासन-बलदीया सरकार' आणि स.नं. ३१८ ते ३२४, ३२८, ३२९ व ३३० मधील जमिनीवरील खाजगी व्यक्तींची नावे कमी करून 'महाराष्ट्र शासन-महसूल विभाग' अशी नोंद घेण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक २२/०१/२०१६ रोजी आदेश पारीत केले होते. सदर आदेशाविरुध्द पटेल कत्रुवार ॲण्ड कंपनी यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र. १३३८/२०१६ दाखल केली होती. सदर याचिकेत याचिकाकर्ता यांनी त्यांना सुनावणीची संधी न देता जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक २२/०१/२०१६ रोजी काढलेले आदेश रद्द करण्याची विनंती केली होती. त्यावर जिल्हाधिकारी, परभणी यांनी याचिकाकर्त्यास त्यांचे म्हणणे सादर करण्याची पुरेशी संधी देऊन त्यानुसार उचित निर्णय घेण्यात येईल असे मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांना अवगत केले होते. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३/२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये सदर याचिका निकाली काढली आहे. प्रश्नाधीन जमिनीबाबत सुनावणीची संधी देऊन त्यांचे लेखी/तोंडी म्हणणे व कागदपत्रे विचारात घेऊन निर्णय देण्यासाठी जिल्हाधिकारी, परभणी यांनी प्रकरण राखून ठेवले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**घिवली (ता.जि.पालघर) गावात धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(३२) * ३०४४५ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घिवली (ता.जि.पालघर) गावाच्या सन २००९-२०११ या कालावधीत ४५० मीटर लांबीचा धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित ७०० मीटर लांबीच्या बंधाऱ्याच्या कामास सन २०१५-१६ मध्ये रुपये १.५० कोटी मंजूर असतांनाही तिवरींच्या झुडपांमुळे काम सुरु केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री व सदस्य सचिव, पर्यावरण यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये तिवरींची झुडपे स्वच्छ करण्याबाबत निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू उर्वरित बंधारा पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे. घिवली (ता.जि.पालघर) गावाजवळ १३० मी. लांबीचा बंधारा बांधण्याचे काम सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रुपये १.५० कोटी अंदाजित किंमतीचे समाविष्ठ असून त्यासाठी रुपये ३२.६१ लक्ष निधीची तरतूद आहे.
(२) होय.
(३) धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र (CRZ Clearance) घेण्यासाठी कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाड (जि.रायगड) तालुक्यातील सावित्री नदीवरील नवीन पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(३३) * २६७४० श्री.शरद रणपिसे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४९०६ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील सावित्री नदीवरील पूल वाहून गेल्यामुळे ३८ जणांचा मृत्यू झाला होता व याठिकाणी नवीन पूलाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून कित्येक महिन्यांचा कालावधी होऊनही नवीन पूल बांधण्याचे काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, सदर पूल बांधण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे व सदर काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) सावित्री नदीवरील पूल वाहून गेल्यामुळे ३७ जणांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे.

त्याला पर्याय म्हणून रुपये ३५.७७ कोटी अंदाजित किंमतीच्या २३९ मी. लांबीचा नवीन तीन पदरी पूल बांधण्याचे काम प्रगतीत असून जून, २०१७ पर्यंत पुलाचे काम पूर्ण करणेचे नियोजन आहे. ह्या कामासाठी सन २०१६-१७ हया वर्षासाठी रुपये २१.४६ कोटी व सन २०१७-१८ हया वर्षासाठी उर्वरीत रुपये १४.३० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहतुकादारांवर कारवाई करण्याबाबत**

**(३४) * २९४८६ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन कायद्यानुसार खाजगी बसेस (लक्झरी) एका ठिकाणाहुन निघाल्यानंतर दुसऱ्या ठिकाणी प्रवासी घेणे (टप्पा वाहतूक) कायद्यानुसार बंदी असताना मुंबई शहरातून रात्री व दिवसा निघणाऱ्या खाजगी लक्झरी बसेस नवी मुंबई, पनवेल, खारघर, कामोठे, कोळंबली, पनवेल शहर तसेच ठाणे येथील तीन हात नाका अशा थांबावर दररोज १५० ते २०० च्यावर लक्झरी बसेस थांबत असून अशा वाहनावर कारवाई होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध प्रवासी वाहतुकीमुळे राज्य परिवहन (एस.टी.) महामंडळाचे करोडो रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणी प्रादेशिक परिवहन कार्यालयावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) मोटार वाहनाच्या कायद्यातील तरतूदीनुसार राज्यातील टप्पापध्दतीने प्रवासी वाहतूकीचे एकाधिकार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास आहेत. तसेच मोटार वाहन कायद्यानुसार खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसना कंत्राटी प्रवाशी वाहतूकीचा परवाना दिला जातो. तथापि, अशा वाहतूकीव्दारे करण्यात येणाऱ्या चोरट्या वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, वाहतूक पोलीस व परिवहन विभाग यांच्या संयुक्त पथकाव्दारे कार्यवाही करण्यात येते. तसेच मुंबई (मध्य, पूर्व, पश्चिम), ठाणे, पनवेल, बोरीवली व वाशी या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायूवेग पथकामार्फत नियमित तपासणी करण्यात येते. एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या ३३,६६२ वाहने तपासण्यात आली असता यामध्ये ५,७८९ वाहने दोषी आढळली आहेत. वरील दोषी वाहनांपैकी ४,०७२ वाहनांची प्रकरणे निकाली काढण्यात येवून रुपये १,३३,४४,०००/- एवढा दंड व रुपये २,१२,५३,०००/- एवढा कर वसुल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत

**(३५) * ३०४१० श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील रेती साठ्यांचे लिलाव न झालेल्या ठिकाणच्या घाटवरुन स्थानिक प्रशासनाच्या व वाळु माफियांच्या संगनमताने दररोज शेकडो ब्रास रेती काढली जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत तसेच संबंधित अधिकारी व वाळूमाफिया यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नांदेड जिल्ह्यातील माहूर तालुक्यात सन २०१६-१७ मधील लिलावासाठी ५ वाळूगट निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी २ वाळूगट लिलावात गेले असून, उर्वरित ३ वाळूगटांच्या फेरलिलावाची कार्यवाही सुरू आहे.

लिलाव न झालेल्या वाळूगटातून वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीकोनातून भरारी व बैठ्या पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. वाळूची अवैध वाहतुक रोखण्यासाठी चेकपोस्टची स्थापना करण्यात आली असून, त्या ठिकाणी २४ तास पथक कार्यरत ठेवण्यात आले आहे. सदर पथकांमार्फत माहे एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत केलेल्या तपासणीत माहूर तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या २५ प्रकरणांत कारवाई करून रुपये ५,६६,१५०/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

स्थानिक प्रशासनाच्या संगनमताने दररोज शेकडो ब्रास रेतीचे उत्खनन केले जात असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्रे बंद करण्यात आल्याबाबत

**(३६) * २९९००  श्री.नारायण राणे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात तहसील कार्यालयात कार्यरत असणारी सर्व सेतू सुविधा केंद्रे बंद (सील) करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सेतू सुविधा केंद्राअभावी स्थानिकांची गैरसोय होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सेतू केंद्र चालकाने शासनाला मिळणारा महसूल शासन जमा न केल्याने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी संबंधित कंपनीसोबतचा करार संपुष्टात आणला असून जिल्ह्यातील कोणतेही सेतू सुविधा केंद्र बंद (सील) करण्यात आलेले नाही. सेतू ठेकेदार यांचे बरोबरचा करार रद्द केल्याने सेतू सुविधा केंद्रातील सेतू बाबतचे कामकाज सर्व संबंधित तहसिलदार यांचेकडे सोपविण्यात आले होते. तद्‌नंतर जिल्ह्यातील ९ सेतू सुविधा केंद्रांमध्ये सेतू व्यवस्थापक नेमण्या कामीचा स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव प्रसिध्द करुन जिल्ह्यातील ९ सेतू सुविधा केंद्रांच्या ठिकाणी ९ सेतू सुविधा व्यवस्थापकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील सर्व ९ सेतू

सुविधा केंद्र व्यवस्थापक यांना दिनांक ०१/०२/२०१७ पासून सेतू सुविधा केंद्र ताब्यात दिलेले असून त्यांचे मार्फत जिल्ह्यातील सर्व सेतू सुविधा केंद्रांचे कामकाज सुरळीतपणे व विनातक्रार सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कोतवालांना चतुर्थश्रेणीचा दर्जा देण्याबाबत**

**(३७) * २९४४१ श्री.सुजितसिंह ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक १६७३२ ला दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोतवालांना चतुर्थश्रेणीचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रस्तावावर अंमलबजावणी होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) राज्यातील कोतवालांची प्रमुख मागणी चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत आहे. त्यानुषंगाने कोतवालांच्या विविध संघटनांकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा मिळावा या संबंधिच्या मागणी संदर्भात संबंधित विभागाकडून प्राप्त अभिप्रायांचा विचार करुन सदर प्रस्ताव शासनस्तरावर यापूर्वी अमान्य करण्यात आलेला आहे.

तथापि राज्यातील कोतवालांप्रमाणे इतर मानधनावर असलेल्या कर्मचाऱ्यांचीही तत्सम मागणी विचारात घेता अशा मानधनावर असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी, त्यांच्यासाठी “एकछत्र योजना” तयार करण्याकामी अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली एक सचिव समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यानुषंगाने पुढील उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपळगाव हरेश्वर (ता.पाचोरा, जि.जळगांव) बस स्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३८) * २९६३९ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव हरेश्वर (ता.पाचोरा, जि.जळगांव) बस स्थानकाची मुलभूत सोयी-सुविधेअभावी दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बस स्थानकांची दुरुस्ती करण्याबाबत प्रवाश्यांनी शासनाकडे मागणी करूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर बसस्थानकाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) पिंपळगाव हरेश्वर ता.पाचोरा येथील मार्ग निवारा ४० वर्षापुर्वी बांधण्यात आलेला असून, सदर मार्ग निवाऱ्याची दुरुस्ती करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी (जि.परभणी) तालुक्यात अवैधरित्या वाळू साठे व लिलाव या गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत**

**(३९) * २७७७८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४५१७ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) तालुक्यात अवैधरित्या साठवून ठेवलेल्या वाळूचा लिलाव करण्याकडे उपविभागीय अधिकारी, परभणी व तहसिलदार, परभणी यांनी दुर्लक्ष केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र तयार करुन विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, परभणी यांच्या स्तरावरून पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी अधिकाऱ्यांविरूध्द विहित मुदतीत दोषारोप पत्र सादर न करता त्यांना पाठीशी घालण्याचा प्रकार जिल्हा प्रशासनस्तरावरून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलेल्या अंतिम कार्यवाहीबाबतची थोडक्यात माहिती काय आहे, तसेच शासनाचे झालेले आर्थिक नुकसान वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) परभणी तालुक्यातील अवैधरित्या साठवून ठेवलेल्या वाळूचा लिलाव करण्याकडे उपविभागीय अधिकारी, परभणी व तहसिलदार परभणी यांनी दुर्लक्ष केल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, त्यांच्याविरूध्द जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक २५/११/२०१६ रोजी दोषारोपपत्र तयार करून विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर केले होते. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून अधिकचा खुलासा मागविला असून, सदर खुलासा प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

परभणी तालुक्यातील अवैध रेतीसाठ्यांपैकी २१ रेतीसाठ्यांचा लिलाव करुन, त्याद्वारे प्राप्त झालेली रक्कम रुपये २९,२६,५००/- शासनजमा करण्यात आली आहे. ३१ अवैध रेतीसाठाधारकांच्या मालकीच्या जमिनीच्या गाव नमूना नंबर ७/१२ वर रुपये ७९,७०,६३६/- एवढ्या महसूली थकबाकीचा बोजा चढविण्यात आला आहे. तसेच उर्वरित रेतीसाठ्यांचा लिलाव करण्याची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्या स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यात स्थावर मालमत्तेच्या मुल्यांकन करताना नागरीकांची फसवणूक होत असल्याबाबत

**(४०) * २८९३४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन सोपे करण्यासाठी व्हॅल्यूएशन मॉड्यूल ही संगणक प्रणाली विकसित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपल्या स्थावर मालमत्तेची नोंदणी करताना त्याची रेडीरेकनरनुसार नेमकी किंमत किती व त्यावर किती मुद्रांक शुल्क भरावे लागेल याची माहिती सहजपणे नागरीकांना मिळत नसल्यामुळे वसई (जि.पालघर) तालुक्यात मुल्यांकनासाठी दलांलाकडून नागरीकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुय्यम निबंधक कार्यालयात विशेष संगणक प्रणाली विकसित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यात दस्त नोंदणीच्या कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी वापरण्यात येणा-या i-SARITA (आय-सरिता) या आज्ञावलीमध्ये जनतेस स्थावर मालमत्तेच्या मूल्यांकनामध्ये सहाय्य करण्याच्या दृष्टीने “व्हॅल्यूएशन मॉड्यूल” विकसित करण्यात आले आहे.
(२) असे निदर्शनास आले नाही.

दस्ताची नोंदणी करताना मिळकतीचे बाजारमूल्य संगणक प्रणालीद्वारे करण्यात येते व त्या मूल्यांकन अहवालाची एक प्रत दस्ताचा भाग म्हणून जोडून घेण्यात येते. अशा रितीने बाजारमूल्य दर तक्त्यातील दरानुसार बाजारमूल्य किती होईल याची माहिती जनतेला उपलब्ध होते. या शिवाय दस्त नोंदणीपूर्वी एखाद्या मिळकतीचे बाजारमूल्य किती परिगणित होईल याची माहिती दुय्यम निबंधक कार्यालयाबाहेर तसेच विभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या दर तक्त्यानुसार, पक्षकारांना स्वत: मुल्यांकन परिगणित करता येते. तसेच त्यांना मूल्यांकन अहवाल आवश्यक असल्यास त्यांनी संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयाकडे आवश्यक त्या माहितीसह अर्ज केल्यास, दुय्यम निबंधकाकडून अशा मिळकतीचे रुपये १००/- इतकी फी आकारुन मूल्यांकन परिगणित करुन तसा अहवाल पक्षकारांना देण्यात येतो.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शीव-पनवेल महामार्गावरील वाशी खाडीवर पूल बांधण्याबाबत

**(४१) * २६७४३ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शीव-पनवेल महामार्गावरील वाढती रहदारी, पुलावर येणारा वाहनांचा भार आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी इत्यादींचा विचार करुन वाशी खाडीवर तिसरा पूल उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, केव्हा, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त पूल बांधण्याच्या प्रकल्पासाठी किती खर्च येणे अपेक्षित आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) व (३) ठाणे खाडीवर तिसरा पूल बांधण्याचा निर्णय मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीच्या दिनांक ३०/११/२०१५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल महामंडळामार्फत पूर्ण करण्यात आला असून प्रकल्प सल्लागाराने त्याबाबत सादर केलेल्या अहवालानुसार सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत साधारणपणे रुपये ७७५ कोटी इतकी आहे.

सदर प्रकल्पाचा खर्च भागविण्यासाठी महामंडळामार्फत प्रकल्पाचे बांधकाम इपीसी तत्वावर पुर्ण करण्यासाठी कर्ज रोखे उभारुन निधी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.